पुढारी | रविवार, २६ जानेवारी २०२०

बहार

# तणाव, तेल आणि भारत



• बहार विशेष

**अमेरिका आणि इराणदरम्यान तणावाची स्थिती निर्माण झाल्यामुळे तेलाचे आंतरराष्ट्रीय बाजारातील दर वाढले. परंतु, तणाव लवकर सौम्य झाला आणि दर पुन्हा पूर्ववत झाले. तेलाच्या बाजारपेठेची काही मूलभूत वैशिष्ट्ये असून, आंतरराष्ट्रीय दर निश्चित असले; तरी जागतिक राजकारणाचा त्यांच्यावर थेट परिणाम होतो. भारत आपल्या मागणीपैकी बहुतांश कच्चे तेल आयात करणारा देश असल्यामुळे या दराचा आपल्यावर तातडीने आणि मोठा परिणाम होतो. परंतु, केवळ आंतरराष्ट्रीय तणावच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय करारांचाही तेलाच्या दरांवर परिणाम होतो...**

**सौरभ चंद्र**
माजी पेट्रोलियम सचिव, भारत सरकार

कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची काही मूलभूत वैशिष्ट्ये आहेत. उदाहरणार्थ, जागतिक राजकारणाचा सर्वाधिक प्रभाव पडणारी ही बाजारपेठ आहे. गुणवत्तेनुरूप कच्च्या तेलाच्या दरात क्षेत्रीय स्वरूपाचे काही किरकोळ फरक जरूर आहेत; परंतु तेलाला एक निश्चित आंतरराष्ट्रीय दर आहे. तेलाच्या दरातील चढ-उतारापासून कोणताही देश अलिप्त राहू शकत नाही. दरातील ही अनिश्चितताच तेलाच्या बाजारातील अटळ सत्य आहे. कच्चे तेल आणि पेट्रोलियम पदार्थ हीच जगातील सर्वाधिक आयात-निर्यात होणारी वस्तू आहे. काही अपवाद वगळता तेलाचे सर्व आंतरराष्ट्रीय व्यवहार डॉलरमध्ये होतात. अन्य कोणत्याही चलनाच्या स्वरूपात झालेला व्यापार अमेरिकेला सहन होत नाही आणि डॉलरला आंतरराष्ट्रीय चलन म्हणून मान्यता मिळण्याचे हेच कारण आहे.

दरामधील अनिश्चितता हेच तेलाच्या व्यापारातील मूलभूत वैशिष्ट्य आहे आणि आजमितीस जगाला याच गोष्टीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः, ३ जानेवारीला अमेरिकेने इराणचे लष्करी कमांडर कासिम सुलेमानी यांची इराकमध्ये हत्या घडवून आणल्यानंतर ही अनिश्चितता वाढली. या घटनेमुळे आखाती देशांवर युद्धाचे ढग जमू लागले होते. १९९०-९१ च्या आखाती युद्धानंतर २००३ मधील इराक युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे तेलाचे दर अचानक वाढू लागले. अर्थात, युद्धाबाबत अनेक शंका व्यक्त होत असतानाच परिस्थिती लवकरच नियंत्रणात आली आणि तेलाचे दर पूर्ववत झाले. तसे पाहायला गेल्यास अमेरिकेत तेलाच्या दरांवर देशांतर्गत अंकुश लावणे ही ट्रम्प प्रशासनाची जबाबदारी आहे. कारण, या वर्षाच्या अखेरीस त्यांना आणखी एका कार्यकाळासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरायचे आहे.

भारताचा विचार करता तेलाचे देशांतर्गत उत्पादन इतके कमी आहे की, त्यातून आपली अवघी १७ टक्के गरज पूर्ण करता येते. उर्वरित गरज पूर्ण करण्यासाठी आपल्याला इतर देशांमधून तेल आयात करावे लागते. आयात होणाऱ्या तेलाची टक्केवारी गेल्या काही वर्षांत सातत्याने वाढत आहे, ही चिंतेची बाब आहे. वाढती मागणी आणि देशांतर्गत उत्पादनात झालेली घसरण ही यामागील कारणे आहेत. देशात सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) वाढीसाठी ऊर्जेची गरज आहे, हे उघड आहे. पेट्रोलियम पदार्थ हा 'एनर्जी बास्केट'चा (ऊर्जेची एकूण गरज) महत्त्वाचा हिस्सा आहे. त्यामुळे तेलाची सातत्याने वाढत असलेली आयात हा चिंतेचा विषय आहे. याचा थेट परिणाम देशाच्या ऊर्जा सुरक्षेवर होतो. विशेषतः, जेव्हा आयात तेलाचा मोठा हिस्सा आग्नेय आशियाई देशांकडून आयात केला जातो, तेव्हा चिंता अधिक वाढते. तेलाच्या मुबलक उपलब्धतेमुळे गेल्या शंभर वर्षांपासून हे क्षेत्र महाशक्तींचे आकर्षण केंद्र बनले आहे. गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये सौदी अरेबियातील तेलाच्या दोन प्रक्रिया केंद्रांवर ड्रोन हल्ला झाला होता, तो याच क्षेत्रात. या हल्ल्याचा आरोप इराणवर ठेवण्यात आला होता; परंतु तो शाबीत होऊ शकला नाही. अर्थात, या हल्ल्यानंतर काही दिवसांसाठी सौदी अरेबियाच्या ५७ लाख बॅरल प्रतिदिन या उत्पादन क्षमतेवर परिणाम झाला होता. इराणसुद्धा याच क्षेत्रात आहे आणि अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांमुळे इराणची निर्यात जवळजवळ शून्य झाली आहे. त्यामुळे इराणची आर्थिक स्थिती खूपच बिघडली आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी तेलाचे दर हा खूपच महत्त्वपूर्ण घटक आहे. कच्च्या तेलाच्या दरात प्रतिबॅरल एक डॉलरने जरी वाढ झाली, तरी भारताचे तेल आयातीचे बिल ६,३०० कोटी रुपयांनी वाढते. आयातीवरील खर्चात झालेल्या वाढीची भरपाई निर्यातीतून झाली नाही, तर रुपयाचे मूल्य घसरते. विनिमय दरात डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य एक रुपयाने घसरल्यास कच्च्या तेलाच्या आयातीचे बिल ५,९०० कोटींनी वाढते. व्यापारी तूट आणि चालू खात्यातील तूट यांचा थेट परिणाम जीडीपीवर होतो. कच्च्या तेलाचे दर सरकारच्या राजकोषीय स्थितीवर आणि महागाईवर थेट परिणाम करतात. इराण आणि अमेरिकेदरम्यान उद्‌भवलेला तणाव कमी झाल्यामुळे कच्च्या तेलाचे दर उतरले आणि भारताने सुटकेचा निःश्वास सोडला. मात्र, आव्हान अजूनही संपुष्टात आलेले नाही. भू-राजकीय आणि भू-आर्थिकस्तरावर विषम स्थितीचे जे आकलन करण्यात आले होते, ते तूर्तास निराधार ठरले आहे. त्यामुळे आता कच्च्या तेलाची मागणी आणि पुरवठा यातील संतुलनाकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेपासून बचावासाठी तयार करण्यात आलेले समूह गेल्या काही दशकांपासून तेलाच्या दरावर नियंत्रण ठेवत आहेत, हे आपण समजून घेतले पाहिजे. १९३० पासून टेक्सास रेलरोड कमिशन उत्पादकांचा कोटा निर्धारित करून कच्च्या तेलाच्या दरांचे नियमन करीत आहे. सन १९६० मध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'ओपेक'ची निर्मिती याच धर्तीवर झाली आहे. १४ देशांचा हा समूह जगाच्या तेल उत्पादनातील ४० टक्के उत्पादन करतो. या समूहाच्या सदस्य देशांकडे जगाच्या एकंदर तेलसाठ्यांपैकी ८० टक्के तेल आहे. याच समूहाने २०१७ मध्ये रशिया आणि अन्य नऊ देशांच्या साथीने तेलाच्या उत्पादनात १२ लाख बॅरल प्रतिदिन इतकी कपात करण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय यावर्षीच्या मार्चपर्यंत वैध असणार आहे. अमेरिकेचे वाढलेले तेल उत्पादन आणि मागणी वाढण्याच्या दरात झालेल्या घसरणीच्या पार्श्वभूमीवर (पान २ वर)